शनिवार दिनांक १२/०३/२०१६ रोजी सकाळी ०१.३० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह कराड जि.सातारा येथे झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित असलेल्या सभासदाची नावे | |
| --- | --- | --- |
| शनिवार दिनांक १२/०३/२०१६ रोजी सकाळी १.३० वाजता | १) मा.श्री.साळुंखे प्रदीप उर्फ रवि सुर्यकांत | सभापती |
| | २) मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र | सदस्या |
| | ३) मा.श्री.पवार शशिकात निवृत्ती | सदस्य |
| | ४) मा.सौ.घाडगे सावित्रा मानाजी | सदस्या |
| | ५) मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर | सदस्या |

सर्व संबधितांचे उपस्थितीमध्ये मा.सभापती बांधकाम समिती जिल्हा परिषद सातारा यांचे परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

विषय क्रं.१ :- दिनांक १९.०२.२०१६ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्रं.२३५ :- दिनांक १९.०२.२०१६ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेत आला.

सूचक :- मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर
अनुमोदक:- मा.घाडगे सावित्रा मानाजी

**ठराव सर्वानुमते मंजूर**

विषय क्रं.२ :- विविध योजनांच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणे.

ठराव क्रं. २३६ :- विविध योजनेच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणेत आला. तसेच कामे मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने उप अभियंता यांना आवश्यक त्या सूचना देणेत आल्या.

सूचक :- मा.श्री.पवार शशिकांत निवृत्ती
अनुमोदक :- मा.सौ.पाटील सरेखा महेंद्र

ठराव सर्वानुमते मंजूर

ऐ.विषय क्रं. ३ :- श्री राम धारेश्वर देवस्थान दिवशी खु. तिर्थक्षेत्राचे ठिकाणी भक्तनिवास बांधणे या कामाची मे.एस.सी.कोळेकर अन्ड सन्स ता.पाटण जि.सातारा यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५० टक्के कमी दराची र.रु. २९,९२,०१९/- ची ई – निविदा स्विकृती बाबत विचार करणे.

ठराव क्रं.२३७ :- ब वर्ग यात्रा स्थळ या लेखाशिर्षाखाली मंजूर श्री राम धारेश्वर देवस्थान दिवशी खु. तिर्थक्षेत्राचे ठिकाणी भक्तनिवास बांधणे या कामाची मे.एस.सी.कोळेकर, ॲन्ड सन्स ता.पाटण जि.सातारा यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५० टक्के कमी दराची रक्कम रु.२९,९२,०१९/-ची निविदा सर्वात कमी दराची असून ती स्वीकृतीस पात्र आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२६ नुसार व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९ मंत्रालय मुंबई दिनांक ३१ जानेवारी २०१३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर कामाची मे एस सी कोळेकर अॅन्ड सन्स ता.पाटण जि.सातारा यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५० टक्के कमी दराची रक्कम रुपये २९,९२,०१९/- ची ई निविदा स्विकारणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र

अनुमोदक :- मा.श्री.पवार शशिकांत निवृत्ती

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ऐ.विषय क्रं.४ -** सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत रा मा १४२ ते कालगांव खराडे कवठे कोणेगांव शिरवडे ते रा मा १४२ कारखाना रस्ता इजिमा १२९ सा क्र १२/६०० मसूर रेल्वे गेटजवळ मोरी बांधकाम करणे ता.करांड र.रु.२५.०० लक्ष चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी देणे बाबत.

ठराव क्रं.२३८ -- सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०१५-१६ ५०५४ जिल्हा इतर मार्ग विकास व मजबूतीकरण अंतर्गत रा मा १४२ ते कालगांव खराडे कवठे कोणेगांव शिरवडे ते रामा १४२ कारखाना रस्ता इजिमा १२९ सा क्र १२/६०० मसुर रेल्वे गेटजवळ मोरी बांधकाम करणे ता कराड हे काम वार्षिक कृती आराखडयात समाविष्ट आहे . सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २५.०० लक्ष आहे. त्यामुळे सदरच्या महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२५ नुसार व सुधारीत शासन निर्णय क्रमांक झेड पी ए २०१२/प्रक्र.६८०/वित्त-९ दिनांक ३१ जानेवारी २०१३ नुसार मंजूरीचे अधिकार हे बांधकाम समितीस आहे तयानुसार ही सभा या कामास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक :- मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र

अनुमोदक :- मा.श्री.पवार शशिकांत निवृत्ती

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ऐ.विषय क्रं.५** सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत रा मा १४२ ते कालगांव खराडे कवठे कोणेगांव शिरवडे ते रा मा १४२ कारखाना रस्ता इजिमा १२९ सा क्र ६/७५० मध्ये खराडे गावानजीक मोरी बांधकाम करणे ता.करांड र.रु.२५.०० लक्ष चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देणे बाबत.

ठराव क्रं.२३९ -- सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०१५-१६ ५०५४ जिल्हा इतर मार्ग विकास व मजबूतीकरण अंतर्गत रा मा १४२ ते कालगांव खराडे कवठे कोणेगांव शिरवडे ते रामा १४२ कारखाना रस्ता इजिमा १२९ सा क्र ६/७५० मध्ये खराडे गावानजीक मोरी बांधकाम करणे ता.कराड हे काम वार्षिक कृती आराखडयात समाविष्ट आहे . सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २५.०० लक्ष आहे. त्यामुळे सदरच्या महाराष्ट्र जिल्हार परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२५ नुसार व सुधारीत शासन निर्णय क्रमांक झेड पी ए २०१२/प्रक्र.६८०/वित्त-९ दिनांक

३१ जानेवारी २०१३ नुसार मंजूरीचे अधिकार हे बांधकाम समितीस आहे तयानुसार ही सभा या कामास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सूचक :- मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर
अनुमोदक:- मा.घाडगे सावित्रा मानाजी

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ऐ.विषय क्रं.६** सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत कवठे ते वडोली भिकेश्वर कोणेगांव रस्ता ग्रामा ३६ सा क्र ०/७५० मध्ये मोरी बांधकाम करणे ता.कराड र रु.२५.०० लक्ष चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देणे बाबत

ठराव क्रं.२४० -- सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०१५-१६ ५०५४ जिल्हा इतर मार्ग विकास व मजबूतीकरण अंतर्गत कवठे ते वडोली भिकेश्वर कोणेगांव रस्ता ग्रामा ३६ सा.क्र.०/७५० मध्ये मोरी बांधकाम करणे ता कराड हे काम वार्षिक कृती आराखडयात समाविष्ठ आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय रकम रुपये २५.०० लक्ष आहे त्यामुळे सदरच्या महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२५ नुसार व सुधारीत शासन निर्णय क्रमांक झेड पी ए २०१२/प्र क्र ६८०/ वित्त ९ दिनांक ३१ जानेवारी २०१३ नुसार मंजुरीचे अधिकार हे बांधकाम समितीस आहे त्यानुसार ही सभा या कामास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सूचक :- मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र
अनुमोदक:- मा.घाडगे सावित्रा मानाजी

**ठराव सर्वानुमते मंजुर**

ऐनवेळचा विषय क्र. ७ – सातारा जिल्हा परिषद पोवई नाक्यावरील जागेत कै.यशवंतरावजी चव्हाण यांचे पुतळयाजवळ एल.ई.डी.स्क्रीन लावण्यासाठी जागा भाडे तत्वावर देणे बाबत विचार विनिमय करुन विषय जिल्हा परिषद सभेस घेणे बाबत शिफारस करणे बाबत विचार विनिमय करणे.

प्रारुप ठराव क्रं.२४१ -- सातारा जिल्हा परिषदेच्या मालकी असलेल्या पोवई नाका परिसरातील स्व.यशवंतरावजी चव्हाण पुतळयाजवळ एल ई डी स्क्रीन बसविणेसाठी जागा भाडयाने मिळणे बाबत श्री.महेश संपत पवार यांनी मागणी केलेली आहे. त्यांना सदर कामासाठी ५ वर्षे या ठराविक कालावधीसाठी करारावर जागा खालील नमुद अट क्रमांक १ ते १२ अटींना अधिन राहुन जागा भाडयाने देण्याबाबतचा विषय ही धोरणात्मक स्वरुपाची बाब असल्याने सदरचा विषय जि.प.सभेत मंजुरीसाठी पाठविणेकामी ही सभा शिफारस करीत आहे.

<u>अटी</u>

१. एल.ई.डी. स्क्रिन वर सार्वजनिक ठिकाणी अश्लील जाहिराती दाखवता येणार नाहीत.

२. सार्वजनिक हितास बाधा/कोणत्याही समाजामध्ये तेढं निर्माण होईल अशा जाहिराती प्रसारीत करता येणार नाहीत.

३. नगरपालिका कर व इतर आवश्यक परवानग्या घेणेची जबाबदारी श्री.महेश संपत पवार यांची राहील.

४. सदरचा एल.ई.डी.स्क्रिन बसविलेनंतर सदरचे परिसरात होणा-या वाहतुकीस कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही याबाबतचा पोलीस खात्याचा नाहरकत प्रमाणपत्र घेणेची जबाबदारी श्री.महेश संपत पवार यांची स्वत:ची राहिल.

५. केलेला भाडेकरार कोणत्याही वेळी मुदतीपुर्वी रद्द करणेचा अधिकार जिल्हा परिषदेस राहील.

६. भाडेकरार ११ महिन्यासाठी मर्यादीत राहील. सदरचा करार अकरा महिन्यानंतर आपोआप संपुष्टात येईल.

७. भाडे रक्कम रुपये ११०००/- ही करारावेळीच भरणा करावी लागेल.

८. सदरचे जागेवर कोणत्याही प्रकारे हक्क अगर दावा सांगता येणार नाही

९. सदर करारा बाबत अथवा प्रसिध्दी बाबत काहीही तक्रारी आल्यास त्याचे सर्व दायीत्व न्यायालयीन बाबीसह श्री. महेश संपत पवार यांचेवर राहिल.

१०. महाराष्ट्र शासनाने अथवा जिल्हा परिषदेने मुदतीपुर्वी सदर करारामध्ये बदल करणेचा वा करार रद्द करणेचा अधिकार राखुन ठेवणेत आलेला आहे.

११. कररनामा करुन देणेचा नियमानुसार करावा लागणारा स्टँम्प पेपरचा खर्च श्री पवार यांनी त्यांचे स्वखर्चाने मुद्रांक शुल्क अधिकारी यांनी ठरविलेप्रमाणे करावयाचा आहे.

१२. भाडे करारावर दिलेली जागेची जिल्हा परिषदेस बांधकाम करणे वा इतर बाबीसाठी आवश्यकता वाटल्यास व सदरवेळी एल.ई.डी. स्क्रीन मुळे अडचण येत आहे असे जिल्हा परिषदेचे मत असल्यास जिल्हा परिषदेने १० दिवसाची पुर्वनोटीस दिलेस उक्त कालावधीत एल.ई.डी. स्क्रीन स्वखर्चाने काढुन घेणे श्री.महेश संपत पवार यांचेवर बंधनकारक राहील.

सुचक – मा. श्री. पवार शशिकांत निवृत्ती
अनुमोदक – मा. सौ. घाडगे सावित्रा मानाजी
"ठराव सर्वानुमते मंजूर"

येणेप्रमाणे विचार विनिमय झालेनंतर मा.जि.प.सदस्य,श्री.पवार शशीकांत निवृत्ती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व सभा संपलेचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| सही/XXX | सही/XXX |
| सचिव | सभापती |
| बांधकाम समिती जि.प.सातारा | बांधकाम समिती जि.प.सातारा |

खरी नक्कल

सचिव
बांधकाम समिती जि.प.सातारा